(१)


# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com


क्र. मजीप्रा/सस/तांशा-१/ २१९ दिनांक : ७/८ फेब्रुवारी, २००४

विषय : **दिनांक २७ जानेवारी, २००४ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९६ व्या सभेचे इतिवृत्त.**

दिनांक २७ जानेवारी, २००४ रोजी दुपारी ३.०० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९६ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी सोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त**

**( दीपक भसाळे )**
**सदस्य सचिव**

८७५/प्र.स.
१०/२/२००४

**प्रधान सचिव,**
**पा.पु. व स्व.विभाग**

इतिवृत्त बरोबर आहे.
मान्यता देण्यात यावी.
९.०२.०४

**मा. मंत्री,**
**ग्रा.वि., पा.पु. व स्व.**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा.**

११६८
११/२/०४

26.2.2004

B.M.Min.-96

आनोसक ११२/जामु ०२
११-२-२००४

M J P
Mumbai-21
Date 27/2/04
Received

मा. ग्रा-१ सदर इतिवृत्ताची प्रत कार्यवाहीसाठी तांशा ने घेतली असून मूळ इतिवृत्त आ-४ कडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवीत असे प्रस्तावित आहे.
९/३/०४

कुप्रअ
आ-४

(2)

**कार्यक्रम बाब क्रमांक : १**

**विषय:- महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९६ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९६ व्या सभेचे प्रारुप इतिवृत्तास प्राधिकरणाच्या संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सोबत जोडण्यात येत आहे.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९६ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ९६ वी सभा मा. मंत्री, ग्राम विकास, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २७ जानेवारी, २००४ रोजी दूपारी ३.०० वाजता संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अजित पवार, मा. मंत्री, ग्रा.वि., पा.पु.व स्व. तथा मजीप्राचे अध्यक्ष.
२. श्रीमती सुलेखाताई कुंभारे, मा. राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाच्या उपाध्यक्षा.
३. श्री. सुनिल तटकरे, मा. राज्य मंत्री, नगर विकास तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
४. श्री. बी. सी. खटुआ, प्रधान सचिव, पा.पु.व स्व. तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
५. श्री. जतिंदरसिंह साहनी, प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा), वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय मुंबई.
६. श्री. एस. एस. हुसेन, प्रधान सचिव, ग्रा.वि.वि. तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
७. श्री. जयंतराव कावळे, सचिव, उर्जा विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
८. श्री. दीपक भसाळे, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.
९. श्री. क. दि. आडिवरेकर, उप-सचिव, प्रतिनिधी, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. श्री. ह. कि. जाधव, उप-सचिव, प्रतिनिधी, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

**या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी उपस्थित होते.**

१. श्री. बी. एस. पाटील, प्रभारी वि.स. व मु. ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
२. श्री. एस. व्ही. दहासहस्त्र, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., ठाणे.
३. श्री. वेंकट कल्याणकर, अधीक्षक अभियंता (समन्वय), म.जी.प्रा., मुंबई.
४. श्री. द. चि. सूर्यवंशी, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), मजीप्रा, मुंबई.
५. श्री. अ. वि. लोखंडे, उप-मुख्यलेखाधिकारी, मजीप्रा, नवी मुंबई.
६. श्री. शेखर गायकवाड, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.

26.2.2004

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

मा. मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली. नव्याने नियुक्त झालेल्या मा. मंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली मजीप्राची ही पहिलीच बैठक असल्याने मजीप्राचे सदस्य सचिव यांनी मा. अध्यक्षमहोदयांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.

**कार्यक्रम बाब क्र. १ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ९५ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दि. १२ मे, २००३ रोजी झालेल्या मजीप्राच्या ९५ व्या सभेच्या इतिवृत्तास मा. मंत्री, ग्रा.वि., पा.पु.व स्व. यांनी मान्यता दिली असून सदर इतिवृत्त प्राधिकरणाच्या रितसर मान्यतेसाठी सादर केल्याचे विशद करण्यात आले. सदर इतिवृत्ताबाबत सर्वसाधारण चर्चा करण्यात येऊन इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २ : अ) म.जी.प्रा.च्या ९४ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.**
**ब) म.जी.प्रा.च्या ९५ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.**

मजीप्राच्या ९४ व ९५ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते त्या निर्णयांच्या अनुषंगाने करण्यात आलेली कार्यवाही या कार्यक्रमबाबी व्दारे सादर करण्यात आल्याचे विशद करण्यात आले. कोणतीही पाणी पुरवठा योजना चालविण्यात येत असताना ती स्वयंसंतुलित असणे आवश्यक आहे त्यामुळे पाणी पुरवठयाचे दर योजना ना नफा ना तोटा या तत्वावर चालावी असे असणे आवश्यक असल्याचे मा. अध्यक्ष महोदयांनी स्पष्ट केले व मजीप्राने त्यांच्याकडील पाणी पुरवठा योजनांबाबत अशी खबरदारी घ्यावी अशा सूचना त्यांनी केल्या. ज्या ठिकाणी मजीप्राकडून पाणी पुरवठा करण्यात येतो त्या ठिकाणचे पाणी पुरवठा दर ठरवत असताना वरील सूचना विचारात घेण्यात येतील ही बाब सदस्य सचिव, मजीप्रा, यांनी मान्य केली. या कार्यक्रमबाबी मधील मुद्यावर सर्वकष चर्चा करण्यात येऊन इतिवृत्तावरील कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ३ : म.जी.प्रा.चे सन २००२ व २००३ या वर्षाचे लेखे स्वीकृत करणेबाबत (अनुसमर्थनार्थ).**

सन २००२-०३ या वर्षाचे मजीप्राचे लेखे स्वीकृत करण्यात आल्यानंतर ते लेखापरिक्षणासाठी सादर करण्यात येतात. त्यामुळे लेखे स्वीकृत करण्याची कार्यक्रम बाब

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

अनुसमर्थनार्थ सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले. या कार्यक्रमबाबीच्या अनुषंगाने चर्चा करत असताना मा. अध्यक्षमहोदयांनी सूचित केले की, महसूल वसुली वाढवण्यासाठी मजीप्राकडून विशेष स्तरावर प्रयत्न होणे आवश्यक आहे. या सूचनांची नोंद घेण्यात आली. मागील लेखापरिक्षणामध्ये जे आक्षेप नोंदविण्यात आले होते त्यानुसार पूर्ण झालेल्या योजनांचे लेखे पूर्ण करणे तसेच निलंबन लेख्यावर असणाऱ्या रकमा कमी करणे याबाबतची कार्यवाही सुरू असल्याचे वि.स.मु.ले.अ. यांनी स्पष्ट केले. याबाबतच्या प्रगतीचा अहवाल पुढील बैठकीमध्ये सादर करावा व प्रलंबित लेख्यांचे काम मार्च-२००४ पर्यंत पूर्ण करावे अशा सूचना मा. अध्यक्ष महोदयांनी केल्या. सध्या जे २००२-०३ चे लेखे स्वीकृतीसाठी सादर केले आहेत ते मान्य करण्यात आले. मात्र या लेख्यांबाबत लेखापरिक्षणात जर काही आक्षेप आले तर त्याची माहिती आगामी सभेमध्ये सादर करण्यात यावी असाही निर्णय घेण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : म.जी.प्रा.ला योजनांसाठी उपलब्ध निधी व त्यानुसार कामाच्या अंमलबजावणीचे नियोजन आणि त्याकरिता कर्जरुपाने निधी उभारणे.**

मजीप्राकडे सद्यस्थितीत ज्या नागरी व ग्रामीण योजना प्रगतीपथावर आहेत त्या योजनांसाठी लागणारा निधी, त्याची उपलब्धता व उभारणी याबाबतची सविस्तर माहिती या कार्यक्रमबाबीव्दारे सादर केल्याचे विशद करण्यात आले. अर्थसंकल्पीय तरतूदीव्दारे प्राप्त होणार निधी अपुरा असल्यामुळे बिगर अर्थसंकल्पिय तरतूदीव्दारे जो निधी उभा करावयाचा आहे त्यास मान्यता मिळण्यासाठी हा प्रस्ताव सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले. या प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात आली.

सोलापूर व जळगाव महानगरपालिकेने हुडको या वित्तीय संस्थेकडून जे कर्ज घेतले आहे त्याची परतफेड त्यांनी न केल्यामुळे हुडकोकडून कर्ज मिळण्यामध्ये अडचणी आल्याचे स्पष्ट करण्यात येऊन अर्थसंकल्प बाहय निधी उभारण्यासाठी हुडको बरोबर बँकाव्दारे देखील कर्ज उभारण्याचा विचार व्हावा असे सूचित करण्यात आले. शासनाकडून मिळणारे रु. १०६.२९ कोटीचे विशेष पुरक अनुदान सत्वर प्राप्त व्हावे यासाठी पाठपुरावा करणे तसेच कर्जरोखे, राष्ट्रीयकृत वा इतर बँकांकडून उर्वरित बाहय अर्थसंकल्प निधी उभारणे हा प्रस्ताव मान्य करण्यात आला. याबाबतची सर्वकष चर्चा करण्यात येऊन वरील मुद्यांच्या अधिन राहून या कार्यक्रमबाबी मधील सूचनांना मान्यता देण्यात आली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ५ : म.जी.प्रा.च्या निविदा समितीने घेतलेल्या निविदा स्वीकृतीच्या व अस्वीकृतीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब.**

ज्या निविदेतील कामांची किंमत रु. ५०० लक्ष पेक्षा जास्त आहे तसेच रु. २५० लक्ष पर्यंतच्या निविदांचे जे देकार प्रचलित दरसूचीनुसार येणाऱ्या किंमतीपेक्षा ५% पेक्षा जास्त दराचे आहेत व ज्या निविदांची किंमत रु. २५० ते ५०० लक्षच्या दरम्यान आहे मात्र प्राप्त देकार प्रचलित दरसूचीनुसार येणाऱ्या किंमतीपेक्षा जास्त दराचे आहे असे सर्व देकार स्वीकृतीसाठी मजीप्राच्या या निविदा समितीसमोर सादर करण्यात येतात. पूर्वी टँकरमुक्ती कार्यक्रमाच्या अनुषंगाने स्वीकृतीसाठी मोठया प्रमाणावर देकार प्राप्त होत होते व मजीप्राची बैठक वारंवार होणे शक्य नसल्यामुळे मजीप्राच्या निविदा समितीची नियुक्ती करण्यात आली असून त्या समितीने स्वीकृतीसाठी सादर झालेल्या देकारांची छाननी करुन निर्णय घ्यावयाचा आहे व सदर समितीने घेतलेल्या निर्णयावर मजीप्राच्या बैठकीमध्ये शिक्कामोर्तब करणे या कार्यप्रणालीचे स्पष्टीकरण करण्यात येऊन मजीप्राच्या निविदा समितीच्या ४२, ४३ व ४४ व्या सभेमध्ये जे देकार स्वीकृत केले वा इतर निर्णय घेतले आहेत त्यावर शिक्कमोर्तब करण्यासाठी हा प्रस्ताव सादर केल्याचे सदस्य सचिव यांनी स्पष्ट केले.

या नंतर निविदा समितीने स्वीकृत केलेल्या देकाराचा आढावा घेण्यात आला व निविदा समितीने घेतलेल्या निर्णयावर शिक्कामोर्तब करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ६ : बीड वाढीव पा.पु.योजना (माजलगांव धरण उद्‌भव) प्रक्रियापूर्व व प्रक्रियोत्तर पाण्याच्या उर्ध्ववाहिनीची कामे दिनांक १५.३.२००४ पर्यंत पूर्ण करुन जलवाहिन्या कार्यान्वित करणेबाबत.**

बीड शहराच्या आसपास असणारे सर्व स्त्रोत पाण्यासाठी वापरण्यात येऊनसुध्दा उपलब्ध पाणी १५ ते २० मार्च पर्यंत पुरु शकेल त्यामुळे बीड शहराची पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी टँकर लावावे लागणार आहेत. मात्र बीडसारख्या १.५० लक्ष लोकसंख्या असणाऱ्या शहरात टँकरव्दारे होणाऱ्या पाणी पुरवठयावर अवलंबून राहणे अव्यवहार्य व अशक्य आहे. त्यामुळे माजलगाव धरणावर आधारित असणारी प्रगतीपथावरील पाणी पुरवठा योजना प्राधान्याने कार्यान्वित करणे आवश्यक असल्यामुळे या योजनेतील प्रक्रियापूर्व व प्रक्रियोत्तर जलवाहिन्यांची कामे १५.३.२००४ पर्यंत पूर्ण करुन त्याव्दारे माजलगाव धरणातील

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

पाणी बीड शहरापर्यंतच्या जलवाहिनीमधून आणणे यासाठी विशेष प्रयत्न सुरू असल्याचे स्पष्ट करण्यात आले. ही कामे पूर्ण करण्यासाठी जे निर्णय घेण्यात आले आहेत ते या कार्यक्रमबाबीव्दारे सादर करण्यात आल्याचे सदस्य सचिव यांनी विषद केले.

या योजनेची किंमत रु. ९५.५३ कोटी असलीतरी पहिल्या टप्प्यामध्ये रु. ३० कोटी किंमतीची कामे पूर्ण करुन बीड शहरापर्यंत पाणी आणणे व शहराची तिव्र पाणी टंचाई समस्या सोडवीणे हा रास्त मार्ग स्वीकारण्यात आलाअसून यासाठी निधीची उभारणी करणे याच्या अधिन राहून नवी मुंबई महापालिकेकडून मोरबे प्रकल्पाच्या कामासाठी उभारलेल्या खुल्या बाजारातील कर्जापोटीची जी परतफेड केलेली आहे त्यापैकी र. ९.६४ कोटी निधी कर्ज म्हणून बीड नगरपालिकेस देण्याचे प्रस्तावीत आहे. त्यासाठी त्यांच्याकडून योग्य तो करारनामा करुन घेणे, ईस्क्रो अकाउंट उघडणे, पाणी पुरवठयाचे दर वाढविणे इत्यादी बाबींची पूर्तता करुन घेऊन कर्जाचे वितरण करावयाचे आहे, हे विषद केले. तसेच, प्रस्तावीत कामे १५.३.०४ पर्यंत पूर्ण करणे गरजेचे असल्यामुळे सार्वजनीक बांधकाम नियमावली क्र. २२० च्या अधिन राहून एम.एस. पाईप्स पुरवठयासाठी जी दरवाढ देण्याचे मान्य करण्यात आले आहे त्याचीही माहिती या कार्यक्रमबाबीव्दारे सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले.

या कार्यक्रमबाबीच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१. हे काम १५.३.०४ पर्यंत पूर्ण करण्याची आवश्यकत विस्तृतपणे विषद करावी.

२. रु. ९.६४ कोटी कर्ज मजीप्राने बीड नगरपारिषदेस वितरीत करणे ही बाब विस्तृतपणे स्पष्ट करावी व या कर्जाची परतफेड नगरपरिषद कशी करणार आहे याबाबत त्यांचा ठराव, करारपत्र, इत्यादीबाबत तपशील सविस्तपणे सादर करावा.

३. ही योजना कार्यान्वित झाल्यानंतर ती चालविण्यासाठी किती खर्च येणार आहे (उदा. विद्युत देयके, अस्थापना खर्च, पाणीपट्टी, इत्यादी) व हा खर्च बीड नगरपरिषद कश्या पध्दतीने भागविणार आहे.

४. सध्याचे पाण्याचे दर व प्रस्तुत योजना कार्यान्वित केल्यानंतर येणारे पाण्याचे दर याबाबतचे वित्तीय विश्लेषण द्यावे आणि त्या बद्दलची नगरपालिकेची भूमिका ही स्पष्ट करण्यात यावी.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

उपरोक्त मुद्यांच्या पूर्ततेसह हा प्रस्ताव मजीप्राच्या आगामी बैठकीमध्ये पुन्हा सादर करावा असे ठरविण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. ७ : म.जी.प्रा.कडील ठेकेदारांच्या समस्या व घेण्यांत आलेले निर्णय.**

राज्याच्या ग्रामीण व नागरी भागात मार्च-२००० पर्यंत शुध्द व पुरेसे पाणी उपलब्ध करुन देण्याच्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने कामे मर्यादीत वेळेत पूर्ण व्हावी म्हणून मजीप्राकडील कंत्राटामध्ये काही वाढीव अटी समाविष्ट करण्यात आल्या होत्या. मात्र जुलै १९९९ पासून कामांना निधिची कमतरता भासू लागली त्यामुळे कामांची प्रगती मंदावली. तसेच इतरही कामे रास्त कारणास्तव विहीत वेळेत पूर्ण करण्यामध्ये विलंब झाला. या कारणांसाठी कंत्राटदारांना जबाबदार धरणे संयुक्तीक नसल्यामुळे कामांना द्यावयाची मुदतवाढ भाववाढीच्या फायद्यासह देणे, जमवाजमव उचलीवरील व्याज कामे रखडलेल्या काळात कमी करणे, इत्यादीबाबत शासन स्तरावर जे आदेश प्राप्त झाले आहेत ते माहितीसाठी सादर केल्याचे स्पष्ट करण्यात आले. तसेच, पी.व्ही.सी. पाईप्ससाठी जे रेझीन वापरण्यात येते त्याचे मूल्यनिर्देशांक प्रसिध्द होत नसल्यामुळे भाववाढीसाठी पी.व्ही.सी. पाईप्स ॲन्ड टयुबींगचे निर्देशांक वापरणे यासाठीचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तो शासनाने मान्य केला असून त्या अनुषंगाने निर्गमित केलेले परिपत्रक इत्यादीची माहिती या कार्यक्रमबाबीव्दारे सादर केल्याचे सदस्य सचिव यांनी विषद केले. या माहितीचा आढावा घेण्यात येऊन केलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. ८ : कंत्राटदारांच्या नोंदणीचे नुतनीकरणाच्या निकषामध्ये शिथिलता देणेबाबत.**

कंत्राटदाराच्या नोंदणीबाबत मजीप्राचे स्वतंत्र निकष असून त्या निकषानुसार कंत्राटदारांची नोंदणी मजीप्राकडून करण्यात येते. मात्र गेल्या ३ /४ वर्षामध्ये निधीच्या कमतरतेमुळे मजीप्रांतर्गत नव्याने निविदा मागविण्याचे प्रमाण खूप मोठया प्रमाणावर कमी झाले आहे. तसेच कामाची प्रगती निधी अभावी कमी झाली आहे. त्यामुळे कंत्राटदारांच्या नोंदणी, नुतनीकरणाच्यावेळी वार्षिक उलाढाल व हातामध्ये असणाऱ्या कामांच्या किंमतीबाबतचे निकष पूर्ण होत नसल्यामुळे कंत्राटदारांना पूर्वीच्या नोंदणीपेक्षा खालच्या वर्गामध्ये नोंदणी द्यावी लागत होती. याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार व्हावा अशी कंत्राटदार संघटनेने मागणी केली होती. याबाबतचा आढावा घेऊन नोंदणी, नुतनीकरणासाठी वार्षिक उलाढाल विचारात घेण्यात येऊ

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

नये मात्र नुतनीकरणाचे इतर निकष पूर्ण होत असल्यास कंत्राटदारांना नोंदणी, नुतनीकरण द्यावे अशा सूचना शासनाच्या निर्देशानुसार निर्गमित केल्याआहेत त्यास कार्योत्तर मान्यता देणे, तसेच याच धर्तीवर आधारीत नूतनीकरणासाठी हातामध्ये असणारी कामे न पाहणे याबाबतीस देखील मान्यता मिळावी म्हणून हा प्रस्ताव सादर केल्याचे सदस्य सचिव यांनी विषद केले. याबाबतच्या वस्तुस्थितीची नोंद घेण्यात येऊन हा प्रस्ताव मान्य करण्यात आला व या मान्यतेनुसार सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी परिपत्रक निर्गमित करावे असे निर्देशित करण्यात आले तसेच हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू करावा जेणे करून नुतनीकरणाच्यावेळी हाती असणाऱ्या कामांच्या किंमतीचे निकष पूर्ण न झाल्याने कंत्राटदारांस खालच्या वर्गात नोंदणी देण्यात आली असेल तर त्यांनाही या सवलतीचा लाभ मिळेल. या सूचना मार्च-२००४ पर्यंत आमलात राहतील. ही बाब देखील मान्य करण्यात आली.

तसेच, वर्ग-१ (स्थापत्य) व वर्ग-१ (अे) (स्थापत्य) मधील कंत्राटदारांच्या नोंदणीसाठी / नोंदणी नुतनीकरणासाठी मुख्य अभियंता यांनी पुनर्विलोकीत करुन स्वाक्षरी केलेले गोपनीय अहवाल वर्ग-२ (स्थापत्य) मधील नोंदणीसाठी / नोंदणी नूतनीकरणासाठी अधीक्षक अभियंता यांनी पूनर्विलोकीत करुन स्वाक्षरी केलेले गोपनीय अहवाल ग्राहय धरण्यासही मान्यता देण्यात आली. ज्या कार्यालयात मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता हे पद अस्तित्वात नाही त्या ठिकाणी शहर अभियंता / जल अभियंता किंवा मुंख्य कार्यकारी अधिकारी यांनी पुनर्विलोकनाअंती स्वाक्षरी केलेले कामाबाबतचे गोपनीय अहवाल ग्राहय धरण्यातही मान्यता देण्यात आली. याबाबतच्या सूचना सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी सत्वर निर्गमित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

**कार्यक्रम बाब क्र. ९ : कंत्राटदारांच्या नोंदणीकृत नावात बदल करणेबाबत.**

कंत्राटदारांची मजीप्राकडील नोंदणी सर्व आवश्यक ते नोंदणीबाबतचे निकष पूर्ण झाल्यानंतर नोंदणी शुल्क प्राप्त करुन घेऊन देण्यात येते. मात्र एकदा नोंदणीकृत झालेल्या नावामध्ये बदल करावयाचा झाल्यास कोणते निकष असावेत याबाबत स्पष्ट तरतूद नियमामध्ये नाही त्यामुळे नोंदणी नियमामध्ये तशी तरतूद करण्यात यावी म्हणून हा प्रस्ताव सादर केल्याचे सदस्य सचिव यांनी विशद केले. याबाबतचा सर्वकष आढावा घेऊन हा प्रस्ताव मान्य करण्यात आला व याबाबतची पुढील कार्यवाही सदस्य सचिव (तांत्रिक) यांनी करण्यास मान्यता देण्यात आली.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १० : नागपूर मलनि:सारण योजना टप्पा-२ भाग-१ अंतर्गत १०० द.ल.लि. प्रतिदन क्षमतेच्या मलशुध्दीकरण केंद्राच्या बांधकामामध्ये उद्‌भवलेल्या, कंत्राटदार मे.एस.एन.घारपुरे, पुणे कंत्राटदार यांच्या आकस्मिक मागण्या मंजूर करणेबाबत.**

नागपूर मलनि:सारण योजनेंतर्गत जे १०० द.ल.लि. क्षमतेचे मलप्रक्रिया केंद्र बांधण्यात आले आहे ते काम पूर्ण होण्यास जो विलंब झाला त्यास कंत्राटदार जबाबदार नाही. विद्युत जोडणी मिळण्यास जो अवाजवी विलंब झाला त्यामुळे कामे पूर्ण होऊनही या मलप्रक्रिया केंद्राची चाचणी कंत्राटदार देऊ शकला नाही. त्यामुळे कामांची सुरक्षा अंतिम देयके करण्यासाठी बँक गॅरंटी वाढवणे, विद्युत व यांत्रिकी उपकरणे प्रत्यक्षात वापरण्याच्यावेळी झालेला अतिरिक्त खर्च, इत्यादी पोटी कंत्राटदारांनी खर्च केलेल्या रकमेची मागणी केली असून ती रास्त असल्याने मान्य करावी असा प्रस्ताव सादर केल्याचे सदस्य सचिव यांनी विशद केले. या प्रस्तावाच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली व प्रस्ताव रास्त नसल्यामुळे नामंजूर करावा असा निर्णय घेण्यात आला.

**कार्यक्रम बाब क्र. ११ : यवतमाळ पाणी पुरवठा योजना उद्‌भव निलोण धरण, ता.यवतमाळ - प्रक्रियापूर्व व शुध्द पाणी उत्सर्जन करणारी जुनी कालबाहय झालेली पंपींग मशिनरी व संबंधीत संयंत्रे या शिर्षाखाली असलेल्या तरतूदीतून बदलणेबाबत.**

यवतमाळ पाणी पुरवठा योजनेंतर्गत कालबाहय झालेली प्रक्रियापूर्व व प्रक्रियोत्तर जलउत्सर्जन मशिनरी व तत्सम यंत्रण बदलणे आवश्यक असल्याचे सदस्य सचिव यांनी स्पष्ट केले. असे केल्याने विद्युत खर्चात रु. ८ लक्ष वार्षिक बचत होईल तसेच पंपाच्या दुरूस्ती खर्चात बचत होईल. तसेच पंप बदलल्यामुळे जास्तीचा पाणी पुरवठा करणे शक्य होईल व त्यामुळे महसूलातही वाढ होईल ही वस्तुस्थिती विशद करुन Augmentation and Improvement to Board Water Works या लेखाशिर्षामधून पंपींग मशिनरी बदलण्याच्या प्रस्तावास मान्यता द्यावी म्हणून ही कार्यक्रम बाब सादर केल्याचे सदस्य सचिव यांनी स्पष्ट केल्यानंतर या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन हा प्रस्ताव मान्य करण्यात

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

आला व याबाबतची पुढील कार्यवाही सदस्य सचिव यांनी सत्वर करावी असे निर्देश देण्यात आले.

तसेच ज्या ज्या ठिकाणी मजीप्राकडून पाणी पुरवठा करण्यात येतो त्या पाणी पुरवठा केंद्रांचा आढावा घेऊन कालबाहय पंपींग मशिनरी बदलणे इत्यादी बाबतचा सर्वकष प्रस्ताव सादर करावा अशा सूचनाही मा. अध्यक्ष महोदयांनी दिल्या.

**कार्यक्रम बाब क्र. १२ : विशेष असाधारण रजा योजना लागू करण्यास म.जी.प्रा.स मान्यता मिळणेबाबत.**

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. अरजा २४०२/२५/सेवा-८, दिनांक ७.१०.२००२ अन्वये विशेष असाधारण रजा योजना शासन स्तरावर लागू करण्यात आली आहे. सदर योजना मजीप्रातील सर्व संवर्गाना शासनाच्या मान्यतेने लागू करावी. या प्रस्तावाबाबत सर्वकष चर्चा करण्यात येऊन हा प्रस्ताव मान्य करण्यात आला व याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १३ : मोरबे प्रकल्पासाठी घेतलेल्या खुल्या बाजारातील कर्जाची नवी मुंबई म.न.पा.ने केलेल्या परतफेडीची रक्कम रु. २५.९७ कोटी इतर म.न.पा./न.पा.चे योजनांना वाटप करण्याच्या प्रस्तावाबाबत.**

मोरबे प्रकल्पासाठी मजीप्राने खुल्या बाजारातील कर्जाव्दारे उभी केलेली रु. २५.९७ कोटी रक्कम नवी मुंबई महापालिकेने मजीप्राकडे परत केलेली असून यापैकी रु. २ कोटी रक्कम मजीप्राच्या सर्व साधारण निधीत पुनःस्थापित करणे व उर्वरित रु. २३.९७ कोटी रक्कम १२.७५% व्याज दराने इतर कामांसाठी वाटप करण्याचा प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात आल्याचे वि.स.व मु.ले.अ. यांनी विशद केले. या प्रस्तावाच्या अनुषंगाने सर्वकष चर्चा करण्यात येऊन (१) बीड पाणी पुरवठा योजना वगळता इतर कर्ज वाटपास मान्यता देण्यात आली. याबाबतची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव व विसमुलेअ यांना प्राधिकृत करण्यात आले.

१ कोल्हापूर पाणी पुरवठा योजनेचा प्रस्तावित कर्ज वाटपापैकी रु. १०.०० पर्यंत कर्ज रक्कम उदगीर पाणी पुरवठा योजनेकडे अतिरिक्त वाटप करण्यात यावे या अटीसह (उदगीर पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव विचारात घेऊन)

[signature] [signature]

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १४ : पुणे येथील म.जी.प्रा.ची जागा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा (BOT) तत्वावर विकसीत करणेबाबत.**

मजीप्राच्या ताब्यातील पुणे येथील पाषाण भागातील सर्व्हे क्र. ११३ (जुना) सुतारवाडी, सर्व्हे क्र. ७/१ (नवीन) च्या ४.८७ हेक्टर मधील १५००० चौ.मी. क्षेत्राची शासकीय मोजणी करण्यासाठी येणाऱ्या खर्चास तसेच त्यापैकी १०,००० चौ.मी. भूखंड विकसित करण्यासाठी आवश्यक असणारे नकाशे व आराखडे शासकीय वास्तु विशारद यांचेकडून तयार करण्यास व त्यासाठीच्या खर्चास मान्यता देण्याबाबत सर्वकष चर्चा करण्यात आली व हा प्रस्ताव रु. ५.० लाख मर्यादेत मान्य करण्यात येऊन याबाबतीची पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र. १५ : शहाड येथील प्रक्रियापूर्व पाण्याचे उदंचन केंद्र व टेमघर येथील जलशुध्दीकरण केंद्रासह प्रक्रियोत्तर पाण्याच्या उदंचन केंद्राची वार्षिक देखभाल दुरुस्ती कंत्राटदाराच्या देयकातून केलेली वसुली परत करणेबाबत.**

शहाड येथील प्रक्रियापूर्व पाण्याचे उदंचनकेंद्र व टेमघर येथील जलशुध्दीकरण केंद्रासह प्रक्रियोत्तर पाण्याच्या उदंचन केंद्राची वार्षिक देखभाल दुरुस्ती कंत्राटाअंतर्गत कंत्राटदाराकडून वसुल करण्यात आलेली रुपये ६३,९८४/- इतकी रक्कम कंत्राटदारांस परत करण्याच्या प्रस्तावास शासनाने मान्यता दिली असून त्यानुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी स्पष्ट केले; याची नोंद घेण्यात येऊन करण्यात येत असलेल्या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १६ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे रौप्य महोत्सवी वर्ष २००३-२००४ (१ नोव्हेंबर २००३ ते १ नोव्हेंबर २००४) साजरे करण्याबाबत.**

१ नोव्हेंबर, २००३ ते १ नोव्हेंबर, २००४ हे मजीप्राचे रौप्य महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करणे, या रौप्य महोत्सवी वर्षात उत्पन्नात वाढ करणे, कार्यालयीन कामकाजात सुधारण करणे, गेल्या २५ वर्षातील कामगिरीचा आढावा घेऊन चांगल्या कामांना प्रसिध्दी देणे, कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणे व ग्राहकोपयोगी योजना प्राधान्याने राबविणे या बाबतच्या प्रस्तावाबाबत सर्वसाधारण चर्चा करण्यात येऊन हा प्रस्ताव मान्य करण्यात आला. यासाठी येणारा अंदाजित

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

खर्च रु. १५ लक्ष विचारात घेऊन यासाठी खास निधीची तरतूद करण्यास देखील मान्यता देण्यात आली. तसेच कार्यालयीन इमारतींचे सुशोभीकरण करणे या अंतर्गत सिडको भवन येथील मजीप्राच्या इमारतीचे सुशोभीकरण करण्याचा प्रस्ताव मा. अध्यक्ष महोदयांना सत्वर सादर करावा व यासाठी किमान रु. २५ लक्षची तरतूद करण्यासही मान्यता देण्यात आली. याबाबतची सर्व कार्यवाही मार्च अखेर पूर्ण व्हावी असेही मा. अध्यक्ष महोदयांनी सूचीत केले.

**कार्यक्रम बाब के. १७ : डोंबिवली मलशुध्दीकरण केंद्र (क्षमता १४ द.ल.लि.) मे.हायड्रालिक्स ॲन्ड जनरल इंजिनिअर्स लि. मुंबई यांच्या निविदेतील मूल्यवृध्दी कलमाबाबत.**

भाववाढीचे कलम डोंबिवली मलप्रक्रिया केंद्राच्या कामाच्या कंत्राटामध्ये अंतर्भूत करत असताना जी त्रुटी राहिली ती अनावधानाने टंकलिखीत झालेली चूक दुरुस्त करुन भाववाढीसाठी दि. ४.२.१९८१ च्या शासन निर्णयातील सूचनांनुसार कार्यवाही करावी. या प्रस्तावाबाबत सर्वकष चर्चा करण्यात आली व प्रस्ताव मान्य करण्यात आला. या सुधारणेनुसार भाववाढीची रक्कम परिगणित करणे व कंत्राटदारास भाववाढीची रक्कम अदा करण्यास देखील मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १८ : ग्रामीण व नागरी पा.पु. योजनांसाठी लागणाऱ्या डी.आय.(के-९) व सी.आय. पाईप्सचा पुरवठा घेणेबाबत.**

प्राधिकरणाकडील नागरी पाणी पुरवठा योजनांसाठी घ्यावयाचे सी. आय. पाईप्स मे. केसोराम स्पन पाईप्स यांच्याशी जो दर करार करण्यात आला आहे त्या करारानुसार घेण्याबाबतची जी कार्यवाही करण्यात आली आहे ती मान्य करण्यात आली. तसेच या दराने इतर उत्पादक कंपन्या जर पाईप्स पुरवठा करण्यास तयार असतील तर त्यांच्याकडूनही सी.आय. पाईप्स घेण्याच्या प्रस्तावासही मान्यता देण्यात आली.

तसेच डी.आय.पाईप्सबाबत मे. किंग्जबर्ग एक्सपोर्ट लिमीटेड यांच्या स्वीकृत केलेल्या निविदेतील दरानुसार पाईप्स पुरवठा प्राप्त करुन घेण्यासही मान्यता देण्यात आली. मात्र मे. किंग्जबर्ग एक्सपोर्ट लि. यांच्याकडून डी.आय. के-९ पाईप्स पुरवठा होणे व त्याची गुणवत्ता सिध्द होण्यापूर्वी मजीप्रास ज्या कामांसाठी तातडीने डी.आय. के-९ पाईप्स आवश्यक आहेत त्यासाठी मजीप्राकडे यापूर्वी ज्या कंपन्यांनी डी.आय. पाईप्स पुरवठा केले आहेत त्या कंपन्या

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

गतवर्षिच्या डी.जी.एस. अँड डी. च्या दरकरारातील दरावर १४.४०% वाढ, मे. किंगजबर्ग एक्सपोर्ट लि. यांच्या स्वीकृत निविदेतील दर व डी.जी.एस. अँड डी.चा सध्याचा दरकरार यापैकी जे दर सर्वात कमी असतील त्या दराने पाईप्स पुरवठा करण्यास तयार असतील त्या उत्पादक कंपन्यांकडून ३% सुरक्षा अनामत रक्कम प्राप्त करुन घेऊन पाईप्स पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. १९ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने शिल्लक निधी गुंतविण्यासंबंधी सुधारित मार्गदर्शक तत्वे.**

राज्य सार्वजनीक उपक्रमांनी शिल्लक निधी गुंतविण्याबाबत शासनाकडून जी वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येतात त्याच्याअधीन राहून मजीप्राकडून शिल्लक निधिची गुंतवणूक करण्यात येते. या गुंतवणुकीचा तपशिल मजीप्राच्या प्रत्येक बैठकीमध्ये सादर करावयाचा असून त्या अनुषंगाने मजीप्राकडून अल्प मुदतीची व दीर्घ मुदतीची जी गुंतवणूक करण्यात आली आहे त्याचा तपशील मान्यतेसाठी सादर केल्याचे वि.स. व मु.ले.अ. यांनी स्पष्ट केले. या गुंतवणूकीबाबत आढावा घेऊन त्यास मान्यता देण्यात आली. मात्र दीर्घ मुदत गुंतवणूकीसाठी निर्णय घेण्याबाबत जी समिती गठीत करण्यात आली आहे, त्या समितीमध्ये मा.राज्यमंत्री, पा.पु. व स्व. तसेच वि.स.व मु.ले.अ. यांना सदस्य म्हणून समावेश करावा असे मा.अध्यक्ष महोदयांनी सूचीत केले व त्यास मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र. २० : कन्हैय्यानगर (कोपरी, ठाणे) येथील म.जी.प्रा.च्या प्रशासकीय इमारतीमध्ये चौथ्या मजल्यावर बैठकीकरिता हॉल बांधणे व माळयापर्यंत उद्‌वाहन व्यवस्था करणे.**

कन्हैया नगर, कोपरी ठाणे येथील मजीप्राच्या प्रशासकीय इमारतीमध्ये चौथ्या मजल्यावर सभागृह बांधणे व चौथ्या माळयापर्यंत उद्‌वाहन व्यवस्था करणे या बाबीच्या प्रस्तावाबाबत सर्वकष चर्चा करण्यात आली व चर्चेअंती असे ठरविण्यात आले की, दिनांक २.२.२००४ रोजी मा. मंत्री, ग्रा.वि. पा.पु.स्व. तथा अध्यक्ष, मजीप्रा, ठाणे येथे येणार असून त्यावेळी या कार्यालयास भेट देतील व सभागृह बांधणे तसेच उद्‌वाहन व्यवस्था करणे इत्यादीबाबत आवश्यक त्या सूचना देतील. या संबंधी आवश्यक तो निर्णय घेण्यास प्राधिकरणाच्या अध्यक्षांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. २१ : जमवाजमव उचलीवरील व्याजदर कमी करणेबाबत.**

मजीप्राकडून सद्यस्थितीत जमवाजमव उचलीवर १८% व्याज आकारणी करण्यात येते. मात्र बाजारामध्ये व्याज दर खूपच कमी झाले असल्याने मजीप्राने देखील जमवाजमव उचलीवर १८% ऐवजी १४% व्याज दर आकारावा या बाबीस मान्यता देण्यात आली, **मात्र हा निर्णय एक वर्षासाठी लागू राहील** व त्यानंतर व्याज दराचा पुन:विचार करुन त्यावेळी बाजारामध्ये जे व्याज दर असतील त्याप्रमाणे उचित निर्णय घ्यावा, असेही ठरविण्यात आले.

बीड, सावळज, सासवड या पाणी पुरवठा योजनेंतर्गत दिलेल्या / द्यावयाच्या जमवाजमव उचलीवर १४% दराने व्याजाची आकारणी करण्यासही मान्यता देण्यात आली.

दिनांक १.११.२००३ पासून पुढे ज्या निविदा स्विकृत करण्यात येतील त्या निविदा ठेकारासाठी हा निर्णय लागू राहील. याबाबतचे परिपत्रक निर्गमित करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**या बैठकीमध्ये मा. अध्यक्ष महोदयांनी केलेल्या विशेष सूचना पुढील प्रमाणे आहेत.**

१) ज्या पाणी पुरवठा केंद्रांच्या ठिकाणची विद्युत जोडणी मजीप्राच्या नावे आहे व पाणी पुरवठा केंद्रे हस्तांतरीत झाली आहेत त्या पाणी पुरवठा केंद्राच्या ठिकाणी विद्युत जोडणी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नावे त्वरीत हस्तांतरीत करुन द्यावी. यासाठी अधीक्षक अभियंता, मजीप्रा यांनी अधीक्षक अभियंता, म.रा.वि.मं. यांच्याशी संपर्क साधून सत्वर कार्यवाही करावी व कोणत्याही परिस्थतीत याबाबतची कार्यवाही ३१.३.२००४ पर्यंत पूर्ण करावी. असे करत असताना, शासनाने नुकत्याच निर्गमीत केलेल्या सूचनांचा आधार घ्यावा व कार्यवाही करावी. याबाबतचा अहवाल पुढील बैठकीत सादर करावा.

२) पाणी पुरवठा योजना स्वयंसंतुलीत होण्यासाठी पाण्याचे दर होणाऱ्या खर्चाच्या आधारे आणि भविष्यातील आकस्मिक खर्चासाठी पुरेशी व्यवस्था ठेऊन ठरविण्यात यावेत.

उपरोक्त चर्चेनंतर मा. अध्यक्ष महोदयांनी उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे घोषित केले.

B.M.Min.-96

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, ग्रा.वि., पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.